# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:14.02.2026** **वारः शनिवार**

---

1. सेवा तीर्थ या नवीन सरकारी कार्यालयीन संकुलाचं पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन. नवीन कार्यालयातून अनेक निर्णय घोषित
2. नवी दिल्ली इथं होणाऱ्या इंडिया ए आय समिट 2026 ला जगभरातील महत्वाचे नेते राहणार उपस्थित
3. उद्या होणाऱ्या महाशिवरात्रिनिमित्त देशभरातील शिवमंदिरात जय्यत तयारी सुरु; पशुपतिनाथ मंदिरातही उत्सवाची तयारी पूर्ण आणि
4. आयसीसी टी ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेत अमेरिका, संयुक्त अरब अमिरातीचे प्रतिस्पर्ध्यावर विजय; ब गटात झिम्बाब्वेकडून ऑस्ट्रेलियाचा पराभव

**<u>पंतप्रधान-सेवातीर्थ</u>**

नवी दिल्लीत उभारण्यात आलेल्या सेवा तीर्थ या कार्यालयीन संकुलाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल करण्यात आलं. या कार्यालयीन संकुलात पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबीनेट सचिवालय यांच्यासह अनेक प्रमुख मंत्रालयांची कार्यालयं आहेत. या नवीन संकुलातील कार्यालयाच्या उद्घाटनानंतर लगेचच, पंतप्रधानांनी अनेक निर्णय घोषित केले. पंतप्रधान राहत योजनेअंतर्गत, अपघातग्रस्तांना दीड लाख रुपयांपर्यंत रोख-विरहित उपचार, मार्च 2029 पर्यंत लखपती दिदींचं लक्ष्य दुप्पट करून सहा कोटी रुपये करणं, कृषी पायाभूत सुविधा निधी दुप्पट करून दोन लाख कोटी रुपये करणं हे निर्णय घेतानाच, द्वितीय स्टार्टअप इंडिया फंडासाठी 10 हजार कोटी रुपयांच्या निधीला पंतप्रधानांनी मंजुरी दिली आहे. शेतकरी, महिला, युवक आणि असुरक्षित नागरिकांसाठी महत्त्वाच्या निर्णयांशी संबंधित महत्त्वाच्या दस्तावेजांवर पंतप्रधानांनी स्वाक्षरी केली.

**<u>पंतप्रधान-समिट</u>**

असंख्य आव्हानं असतानाही, लोकशाहीला बळकटी देणाऱ्या प्रयत्नांमुळं आणि दमदार कामगिरीमुळं हे दशक भारतासाठी अभूतपूर्व विकासाचं दशक आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते काल संध्याकाळी नवी दिल्लीत ईटी नाऊ ग्लोबल बिझनेस समिटला संबोधित करत होते. जागतिक महामारी, जगभरातील तणाव, युद्धं आणि पुरवठा साखळीतील बिघाड अशी आव्हानं जगानं फक्त एका दशकात अनुभवली असल्याचं सांगून ते म्हणाले की, 21 व्या शतकाच्या या दशकात, भारत सुधारणा एक्सप्रेसवर स्वार होत आहे. भारत वेगानं पुढं जात असून जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेनं वाटचाल करत आहे, असंही ते म्हणाले. गेल्या 11 वर्षात केंद्र सरकारनं राबवलेल्या योजनांचा, प्रगतीच्या कामांचा आणि सुधारणांचा त्यांनी यावेळी उल्लेख केला. येणाऱ्या काळात ए आय अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळं अनेक बदल घडणार असून भारत या आव्हानांना आणि बदलांना तोंड देण्यास तयार असल्याचं सांगितलं.

**<u>INDIA-AI</u>**

नवी दिल्ली इथं 16 ते 20 फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या इंडिया ए आय समिट 2026 अर्थात भारत-कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर परिषदे मध्ये जगातील प्रमुख नेते सहभागी होणार आहेत. फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, ब्राझीलचे

अध्यक्ष लुईझ इनासियो लुला दा सिल्वा आणि ग्रीसचे पंतप्रधान किरियाकोस मित्सोटाकिस यांचा या परिषदेला उपस्थित राहण्याऱ्या जागतिक नेत्यांमध्ये समावेश असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं काल जाहीर केलं. ही परिषद 'लोक, ग्रह आणि प्रगती' या तीन सूत्रांवर आधारित असून या द्वारे कृत्रिम बुद्धीमत्ता अर्थात एआयवरील सहकार्यासाठी भारताचा दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. या परिषदेद्वारे एआयच्या भविष्यकालीन वाटचालीवर चर्चा करण्यासाठी, जागतिक नेते, धोरणकर्ते, नवोन्मेषक आणि तज्ज्ञ एकत्र येतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून, इतर अनेक नेते देखील या शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. नेदरलँड्सचे पंतप्रधान डिक शूफ, श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके, भूतानचे पंतप्रधान त्शेरिंग तोबगे आणि मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांचा त्यात समावेश आहे. स्पेन, एस्टोनिया, स्लोवाकिया तसंच स्वित्झर्लंडचे अध्यक्ष, अबू धाबीचे युवराज, क्रोएशिया, फिनलंड तसंच कझाकस्तानचे पंतप्रधान, बोलिव्हिया, गयाना, सर्बिया आणि सेशेल्सचे उपाध्यक्ष हेदेखील या ऐतिहासिक शिखर परिषदेला उपस्थित राहणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार याव्यतिरिक्त 45 हून अधिक देशांच्या मंत्र्यांची शिष्टमंडळं या शिखर परिषदेत सहभागी होतील. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस आणि अनेक आंतरराष्ट्रीय संघटनांचे वरिष्ठ अधिकारी देखील या चर्चेत सहभागी होतील.

**<u>USIBC-INDIA-AI</u>**

यूएस चेंबर ऑफ कॉमर्स आणि USIBC अर्थात यूएस-इंडिया बिझनेस कौन्सिल यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि वरिष्ठ तंत्रज्ञान नेत्यांचं उच्चस्तरीय शिष्टमंडळ देखील एआय इम्पॅक्ट समिट 2026 मध्ये सहभागी होईल. USIBC नं समाज माध्यमावरील पोस्टमध्ये शिष्टमंडळाची घोषणा केली. यामध्ये शिखर परिषद भागीदार म्हणून त्यांची अधिकृत भूमिका आणि दोन्ही राष्ट्रांच्या उद्योगांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी यावर भर देण्यात आला आहे. अमेरिका आणि भारत जगातील सर्वात गतिमान नवोपक्रम परिसंस्थांचं घर असून एकत्रितपणे ते एआयच्या भविष्याचं नेतृत्व करू शकतात, असंही USIBC नं म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान-आसाम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आसामच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर जात आहेत. ते आज सकाळी साडे 10 वाजता दिब्रुगड इथं लढाऊ विमानं, वाहतूक विमानं आणि हेलिकॉप्टरच्या हवाई प्रदर्शनाला उपस्थित राहतील. लष्करी आणि नागरी विमानांच्या आपत्कालीन लँडिंग आणि टेकऑफला सहाय्यभूत ठरेल अशा प्रकारची ईशान्य भारतातील ही पहिलीच आपत्कालीन लँडिंग सुविधा भारतीय वायु दलाच्या मदतीनं तयार करण्यात आली आहे. पंतप्रधान गुवाहाटीमध्ये दुपारी 5 हजार 450 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन करतील.

**<u>पंतप्रधान-हरियाणा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज चंदीगड इथं पीएम ई-बस सेवा योजनेअंतर्गत नवीन इलेक्ट्रिक बस गाड्यांना दूरस्थ पद्धतीनं हिरवा झेंडा दाखवतील. सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेलद्वारे 169 शहरांमध्ये 10 हजार इलेक्ट्रिक बस तैनात करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या पीएम ई-बस सेवा योजनेचं उद्दिष्ट हरित शहरी गतिशीलता वाढवणं, संघटित बस सेवांचा अभाव असलेल्या शहरांवर लक्ष केंद्रित करणं असून यात डेपोमधील पायाभूत सुविधांचा विकासही समाविष्ट आहे.

**<u>संसद अधिवेशन</u>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्याचा काल समारोप झाला. पहिल्या टप्प्याच्या कालच्या अखेरच्या दिवशी लोकसभेत विरोधकांनी विविध मुद्द्यांवरून गदारोळ केल्यामुळं कामकाज स्थगित करण्यात आलं. अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याचं कामकाज 9 मार्चला सुरु होणार आहे. लोकसभेत काल प्रश्नोत्तराच्या तासात विरोधकांनी गदारोळ घातल्यामुळं, कामकाज आधी दुपारी 12 वाजेपर्यंत आणि त्यानंतर 9 मार्चपर्यंत स्थगित करण्यात आलं.

**महाशिवरात्र तयारी**

महाशिवरात्र उद्या साजरी होत आहे. या निमित्त देशभरात अनेक ठिकाणच्या शिवमंदिरात जय्यत तयारी सुरु आहे. काठमांडू इथंही पशुपतिनाथ मंदिरात महाशिवरात्र उत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. या निमित्तानं 8 लाखांहून अधिक भाविक येण्याची अपेक्षा आहे. 17 फेब्रुवारीपर्यंत पाच दिवस चालणाऱ्या या उत्सवादरम्यान भगवान शिवाचं दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येनं यात्रेकरू तसंच नेपाळ आणि भारतातील विविध पंथांचे साधू आणि संत पशुपतिनाथ मंदिरात येतात. गुठी संस्थान आणि नेपाळचे गृह मंत्रालय गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि साधू आणि संतांना त्यांच्या वास्तव्यादरम्यान राहण्यासाठी आवश्यक तयारी करतात.

**मुख्यमंत्री-जपान संबंध**

महाराष्ट्र आणि जपानच्या वाकायामा प्रांतामधील संबंध मैत्रीपूर्ण असून येत्या काळात, जपानबरोबर आर्थिक, सांस्कृतिक, तंत्रज्ञान, उत्पादन आणि सेवा उद्योग क्षेत्रातील संबंध अधिक भक्कम करण्याचा मानस असल्याचं प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. जपानच्या वाकायामा प्रांताचे राज्यपाल मियाझाकी इजुमी यांनी जपानच्या शिष्टमंडळासह काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली. वाकायामा हे जपानमधलं महाराष्ट्राचं प्रवेशद्वार आहे असं सांगत, इजुमी यांनी उभय देशांमधल्या भविष्यातील सहकार्याबद्दल आशा व्यक्त केली.

**Athletics**

ओपन मास्टर्स गेम्स अबू धाबी 2026 मध्ये भारतीय खेळाडूंनी पुरुषांच्या हातोडा फेकीमध्ये दमदार कामगिरी केली. किशोरकुमार चंदिरा मोगननं 30 वर्षांवरील वयोगटात सुवर्णपदक जिंकलं तर मोहम्मद अन्सारनं कांस्यपदक पटकावलं. किशोरकुमारनं अव्वल स्थान पटकावताना 37 पूर्णांक 92 शतांश मीटरची हातोडा फेक केली.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या सामन्यांच्या, पुरुषांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल रात्री चेन्नईतील एमए चिदंबरम मैदानावर झालेल्या अ गटाच्या सामन्यात अमेरिकेनं नेदरलँड्सचा 93 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना अमेरिकेनं निर्धारित 20 षटकांत 6 बाद 196 धावा केल्या, सैतेजा मुक्कामल्लानं सर्वाधिक 79 धावा केल्या. नेदरलँड्सचा संपूर्ण संघ 16 व्या षटकात केवळ 103 धावांत बाद झाला. अमेरिकेकडून हरमीत सिंगनं 4 गडी बाद केले. त्याला सामनावीर घोषित करण्यात आलं. त्यापूर्वी, दिल्ली इथं झालेल्या सामन्यात संयुक्त अरब अमिरातीनं कॅनडाचा 5 गडी राखून पराभव केला, तर कोलंबोमध्ये झालेल्या रोमांचक सामन्यात झिम्बावेनं ऑस्ट्रेलियाचा 23 धावांनी पराभव केला. आज सकाळी 11 वाजता कोलंबोमध्ये आयर्लंडचा सामना ओमानशी होईल, इंग्लंडचा सामना दुपारी 3 वाजता कोलकातामध्ये स्कॉटलंडशी तर न्यूझीलंडचा सामना अहमदाबादमध्ये संध्याकाळी 7 वाजता दक्षिण आफ्रिकेशी होईल.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**